सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्रमांक : विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२६/ 1108
दिनांक 28 APR 2026

**प्रति,**
**प्राचार्य,**
सर्व बी.बी.ए., बी.सी.ए.,अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग,अमरावती.

**विषय : बी.बी.ए.,बी.बी.एम.,बी.एम.एस.,बी.सी.ए या अभ्यासक्रमांकरिता शै.वर्ष २०२५-२६ करिता Adhoc - Fee मंजूर करण्याबाबत...**
**संदर्भ :** संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/बीबीए-बीसीए/विकाप/२०२६/२१५ दिनांक २०.०४.२०२६

उपरोक्त विषयाबाबत, संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने, नमुद करण्यात येते की, बी.बी.ए.,बी.बी.एम.,बी.एम.एस.,एम.बी.ए इंटिग्रेटेड इ.अभ्यासक्रम प्रथमच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून AICTE अंतर्गत आलेले आहेत. सदर अभ्यासक्रमांकरिता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ हे संक्रमण कालावधी वर्ष असल्याने, सदर अभ्यासक्रमांचे शुल्क संबंधित विद्यापीठाने निश्चित करण्याचे निर्देश दिले होते.

शासन निदेशानुसार, व्यापक विद्यार्थी हित विचारांत घेता, बी.बी.ए., बी.बी.एम.,बी.एम.एस.,बी.सी.ए., एम.बी.ए इंटिग्रेटेड इ.अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी संबंधित विद्यापीठांनी ठरविलेले शुल्क हे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता देखील लागू करावे. तसेच, संबंधित संस्थांनी डीबीटी पोर्टलवर त्याप्रमाणे शुल्क भरुन खालीलप्रमाणे दिलेल्या सुचनांचे पालन करुन विभागीय कार्यालयाकडून मंजूर करुन घेऊन, शिष्यवृत्ती / फी प्रतिपूर्ती योजना करिता अर्ज स्विकृती तातडाने सुरु करावी.

**संस्थांनी संदर्भिय पत्रान्वये खालीलप्रमाणे तात्काळ कार्यवाही करावी.**

१. संस्थांनी, डीबीटी लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन संस्थेची माहिती (Institute Profile) सर्व माहिती जसे शैक्षणिक शुल्क, अभ्यासक्रमाचा तपशील इत्यादी (For example: Fee details, Course Details etc.) अचूक भरुन पुढील कार्यवाहीसाठी पाठवून शिष्यवृत्ती संबंधी काम हाताळणारे अधिकारी/कर्मचारी यांनी अभ्यासक्रमाचे शुल्कासंबधी सर्व विद्यापीठ/प्राधिकरण यांचे आदेश व सोबत जोडलेले हमीपत्राच्या नस्तीसह स्वत: उपस्थित राहून संस्थेची Institute Profile मंजूर करुन घ्यावी.

२. संस्थांनी सदर माहिती विभागीय कार्यालयाकडून मंजूर करुन घ्यावी, जेणेकरुन डीबीटी पोर्टलवर संस्थांना त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविता येतील. ( तसेच शैक्षणिक शुल्क मंजूरी प्रलंबित (Fees Not Approved) या कारणास्तव जर संस्थांना विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविता आले नाही तर याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुख यांची राहील याची नोंद घ्यावी.)

३. डीबीटी पोर्टलवर संस्थेकडून भरण्यात आलेले व मंजूरीसाठी पाठविण्यात आलेले शुल्क डीबीटी पोर्टलवर एकदा मंजूर करण्यात आलेल्या शुल्कामध्ये दुरुस्ती करता येणार नाही व मंजूर झालेल्या शुल्कानुसार त्या त्या संबंधित योजनांचा लागू असलेला लाभ देण्यात येतो या कारणास्तव डीबीटी पोर्टलवर संस्थांनी घटकनिहाय शुल्क अचूक भरुन मंजूरीसाठी पाठवावे.

४. संस्थांची माहिती (Institute Profile) अद्ययावत करतांना आवश्यक कागदपत्रे अपलोड करावी (जसे संबंधित शासननिर्णय, शिक्षण शुल्क/विकास शुल्काबाबत विद्यापीठाची शुल्क मंजुरीची प्राचार्यांनी प्रमाणित केलेली कागदपत्रे. परिक्षा शुल्काचे (Exam Fee), विद्यापीठाचे मंजुरीबाबतची कागदपत्रे व सदर शुल्क प्रमाणित केलेले प्राचार्यांचे प्रमाणपत्र (संस्थेकडून सदर कागदपत्रे व परिक्षा शुल्काचे प्राचार्यांचे शुल्क प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडलेले (Upload) नसेल तर डीबीटी पोर्टलवर शुल्काला मंजूरी देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी)

**सहपत्र** : वरीलप्रमाणे

**(डॉ. वि. रं. मानकर)**
**प्र.सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रत:**

**मा.संचालक,** तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

F/c

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ /४८७
ई-मेल-desk१८@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

कालमर्यादीत : स्पीडपोस्ट /ई-मेलद्वारे

जा. क्र. १८/तंशिसं/बीबीए-बीसीए/विकाप/२०२६/ २१५
दिनांक :- २० /०४/२०२६.

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर.

विषय:- बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए या अभ्यासक्रमांकरिता शै.वर्ष २०२५-२६ करिता Adhoc Fee मंजूर करण्याबाबत ...

संदर्भ :उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. शुल्कनि-२०२६/प्र.क्र.१९/तांशि-४, दि.१७/०४/२०२६

उपरोक्त विषयाबाबत, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.१७/०४/२०२६ रोजीच्या सोबत जोडलेल्या पत्राच्या अनुषंगाने, नमुद करण्यात येते की, बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए इंटिग्रेटेड इ. अभ्यासक्रम प्रथमच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून AICTE अंतर्गत आलेले आहेत. सदर अभ्यासक्रमांकरिता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ हे संक्रमण कालावधी वर्ष असल्याने, सदर अभ्यासक्रमांचे शुल्क संबंधित विद्यापीठाने निश्चित करण्याचे निर्देश दिले होते.

शासन निर्देशानुसार, व्यापक विद्यार्थीहित विचारांत घेता, बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए इंटिग्रेटेड इ. अभ्यासक्रमांचे **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी संबंधित विद्यापीठांनी ठरविलेले शुल्क हे शै. वर्ष २०२५-२६ करिता देखील लागू करावे.** तसेच, संबंधित संस्थांनी डीबीटी पोर्टलवर त्या प्रमाणे शुल्क भरुन व मंजूर करुन घेऊन, शिष्यवृत्ती / फी प्रतिपूर्ती योजना करिता अर्ज स्विकृती तातडीने करण्याबाबतची सूचना आपल्या स्तरांवरुन,सर्व संबंधित संस्थांना देण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याच्या दृष्टीने तंत्रशिक्षण संचालनालयास सादर करण्यात यावा.

( डॉ. विनोद म. मोहितकर. )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई

"जनहिताय सर्वदा"

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

४ था मजला, मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्र. ०२२२०४०९३५ Email ID: tashi4-htcd@mah.gov.in

क्रमांक : शुल्कनि-२०२६/प्र.क्र.१९ /तांशि-४ दिनांक : १७ एप्रिल, २०२६

ई-मेलद्वारे

प्रति,

१) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२) कुलसचिव, सर्व संबंधित अकृषि विद्यापीठे.

३) कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड.

४) सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)

विषय:- AICTE अंतर्गत असलेले बी.बी.ए. व बी.सी.ए. व अन्य अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबत...

संदर्भ :- १) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/शा.पत्र/२०२६/१७७, दि.२०.०३.२०२६

२) शासनपत्र क्र. बैठक-२०२५/प्र.क्र.४१/तांशि-४, दि.२०.०५.२०२५

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए. इंटिग्रेटेड इ. अभ्यासक्रम प्रथमच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून AICTE अंतर्गत आलेले आहेत. सदर अभ्यासक्रमांकरिता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ हे संक्रमण कालावधी वर्ष असल्याने, संदर्भाधिन शासनपत्र क्र.२ अन्वये सदर अभ्यासक्रमांचे शुल्क संबंधित विद्यापीठाने निश्चित करुन, त्याबाबतची माहिती संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय यांना सादर करण्याचे निर्देश दिले होते.

त्याप्रमाणे व्यापक विद्यार्थीहित विचारात घेता, AICTE अंतर्गत बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए. इंटिग्रेटेड इ. अभ्यासक्रमांचे शै. वर्ष २०२४-२५ साठी संबंधित विद्यापीठांनी ठरविलेले शुल्क हे शै. वर्ष २०२५-२६ करितादेखील लागू करावे. तसेच संबंधित संस्थानी डी.बी.टी.पोर्टलवर फी भरुन शिष्यवृत्ती / फी प्रतिपूर्ती योजना करिता अर्ज स्विकृती तातडीने करावी व त्याबाबतचा अहवाल तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत शासनास सादर करावा.

(संतोष खोरगडे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-१) मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

२) मा.अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

३) सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई.

४) निवडनस्ती (तांशि-४)

Scanned with OKEN Scanner

## हमीपत्र

मी श्री. ------------------------------------------------------- सचिव/अध्यक्ष व श्री. -----------------------------------
-------------- प्राचार्य ------------------------------------------------------------------डीटीई कोड -----------------
प्रतिज्ञापूर्वक खालीलप्रमाणे हमीपत्र देत आहोत.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,म.शा.मुंबई यांचे पत्र क्र शुल्कनि-२०२६/प्र.क्र.१९/तांशि-४ दिनांक १७ एप्रिल, २०२६ यांचे पत्राच्या अनुषंगाने, बीसीए/बीबीए या अभ्यासक्रमाकरीता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी विद्यापीठाने ठरविलेले शुल्क हे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करितादेखील लागू केलेले शुल्क संस्थेला पुर्णपणे मान्य असून सदर शुल्क डीबीटी पोर्टलवर मंजूर करण्याकरीता संस्थेकडून सादर करण्यात आलेले आहे. तरी सदर शुल्क डीबीटी पोर्टलवर मंजूर करावे. संस्थेने मंजूरीसाठी डीबीटी पोर्टलवर भरलेले शुल्क विभागीय कार्यालयाने डीबीटी पोर्टलवर मंजूर केल्यानंतर शुल्कासंबंधी संस्थेला कोणत्याही प्रकारची तक्रार राहणार नाही.

तसेच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता संस्थेकडून कोणत्याही प्रकाराचा वाढीव शुल्काचा प्रस्ताव शुल्क नियामक प्राधिकरण,मुंबई यांचेकडे सादर करण्यात आलेला नाही.

करीता हमीपत्र सादर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| स्थळ : | सचिव/अध्यक्ष, | प्राचार्य |
| | -------------------------- | ------------------------- |
| दिनांक : | (नाव,स्वाक्षरी,शिक्का) | (नाव,स्वाक्षरी,शिक्का) |